Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 12, June. 2013
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

आदिवासी मराठी कवितेतील विद्रोह

विकास वीर

सारांश

आदी म्हणजे पहिला आणि म्हणून मुख्य किंवा प्रमुख ही छटा त्याला प्राप्त झाली. पुष्कळ वस्तू उत्पन्न होतात, वाढतात आणि मग नाहीशा होतात. हया अवस्थांतील पहिल्या अवस्थेला उगम म्हणतात. (1) थोडक्यात प्रत्येक गोष्टीची सुरूवात ज्यापासून होते त्याचे मूळ म्हणजे आदी होय. वास म्हणजे वास्तव्य, वासी म्हणजे निवासी यावरून आदिवासी म्हणजे मूळनिवासी असा त्या शब्दाचा अर्थ होतो.

प्रस्तावना :

नागर संस्कृतीपासून दूर राहिलेले मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी. आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानवसमाज सोडून, त्यांच्याही पूर्वी भारतात राहणा–या किंवा बाहेरच्या देशातून येउुन वने व पर्वत यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना वन्यजीवी किंवा आदिवासी म्हणतात. (2) अशी आदिवासींबद्दलची माहिती भारतीय संस्कृतीकोशामध्ये दिलेली आहे. तर 19 व्या शतकातील मानवशास्त्रज्ञांच्या संज्ञेनुसार '' एकाच भूभागावर निवास करणा–या, सर्वसामान्यपणे एकच नाव किंवा ठराविक आडनावे, कुळे लावणा–या, एकाच प्रकारची भाशा बोलणा–या, विवाहसंबध आणि व्यवसायाच्या बाबतीत एकाच प्रकारचे, मग ते निशेधात्मक असो वा संमतीदर्शक असे नियम पाळणा–या व निश्चितपणे एका विशिष्ट प्रकारची मूल्ये व विचारप्रणाली यांची जपणूक करणा–या कुटूंबाच्या समुदायाला आदिवासी समुदाय (Tribal Community) किंवा आदिवासी समाज (Tribal Society) असे म्हणतात. (3) अशी व्याख्या केलेली दिसते.

भारतात प्राचीन काळी प्रोटो–आस्ट्रालाईड, मॅगोलाईड व नेग्रिटो हे भिन्न मानववंश राहत होते, यापैकी कोणत्यातरी मानववंशापासून आदिवासींची उत्पत्ती झाली असली पाहिजे. हे मत आता दृढ झाले आहे. आदिवासी हे भारतातील आद्य वसाहतकार मानले जातात. त्यांच्याजवळ आत्मसंरक्षणासाठी लागणरी शस्त्रे व सामर्थ्य नसल्यामुळे द्रविड–इंडोआर्यन व मंगोलियन या लोकांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. संख्याबळ व साधनसामग्री यांनी वरचढ असलेल्या आक्रमणापुढे वन्य जमातींनी हार खावी लागली व डोंगरद–यांचा किंवा जंगलाचा आश्रय करावा लागला. तेंव्हापासून ते आजतागायत हे लोक त्याच जागी कायमची वस्ती करून राहिलेले दिसतात.

2)***आदिवासी साहित्यः मूळ साहित्य :–***

' आदिवासी ' शब्दाची उत्पत्ती शोधत असताना आदिवासी म्हणजे मूळ निवासी हा अर्थ स्वीकारला जातो. या अर्थाप्रमाणेच आदिवासी साहित्य म्हणजे मूळ साहिल्य, पहिले साहित्य, प्रारंभीचे साहित्य अशी भूमिका अभ्यासक मांडतात. त्यांच्या मतानुसार आदिवासींच्या लोककथ–लोकगीते, जानपदगीते, आडाखे, म्हणी आणि वाक्प्रचार या साहित्यावर अनादी काळापासून आदिवासी समाज जगला आणि आजही जगतो आहे. आदिवासींचे हे साहित्य म्हणजे अक्षरवाड.मय आहे, असे मत ते नोंदवितात.

'' मनिशादप्रतिश्ठां त्वमगमः शाश्वती समः ।
यत्क्रोंचमिथुनादेकमवधी काममोहितम ।।''

वाल्याकोळयाचा वाल्मीकी झालेल्या आदिवासीचा हा श्लोक म्हणजे रामायणाचा प्रारंभीचा श्लोक होय. हाच पृथ्वीवरील कवितेचा पहिला जन्म होय. हीच आदिवासी काव्याची पहिली गंगोत्री होय. '' (4) अशी भूमिका तुकाराम रोंगटे घेतात ती रास्तच आहे. यासंदर्भत ते पुढे म्हणतात. '' आदिवासी साहित्याचा पाया इतका मजबूत आहे. त्याचा इमलाही तसाच असणार. अनेकांनी त्याला मराठी वाड.मयातील एक छोटासा प्रवाह म्हटलेले आहे. पण आदिवासी साहित्य हे कोणत्याही साहित्याची प्रतिकृती नाही. कोणत्याही वेगळया प्रेरणांचा आविष्कार त्याने केलेला नाही तर ते संपूर्ण मानव विश्वात, स्वयंभू, स्वतंत्र व स्वयंसिध्दही आहे. मग त्याच्या प्रेरणादेखील त्याच्या अस्तित्वाइतक्याच प्राचीन नसणार का ?..... आदिवासी साहित्य हे या देशातीलच नव्हे तर अखिल विश्वातील आणि महत्वाचे म्हणजे मूळ आद्य मानव समूहांचे व टोळयांचे खास पारंपारिक, सांस्कृतिक मूल्यांनी नटलेले साहित्य आहे. ''(5) असा निर्वाळाही ते ठामपणे देतात. आदिवासी साहित्य हे स्वतंत्र, स्वयंभू व स्वयंसिध्द आहे हे आपणास मान्य करावे लागते. अर्थात हे मान्य करत असतांना दलित साहित्याचे आदिवासी साहित्याच्या बाबतीतील योगदान नाकारून चालणार नाही. वेदना, विद्रोह व नकाराचे दलित साहित्याचे तत्व स्वीकारूनच आदिवासी साहित्याची वाटचाल चाललेली दिसते. म्हणून यासंदर्भत डॉ. जनार्दन वाघमारे लिहितात., ''दलित साहित्याच्या प्रेरणा केवळ मराठी भाषिक पूर्वास्पृश्यांपर्यंत मर्यादित राहिलेल्या नाहीत. त्या आता आदिवासी भटक्या विमुक्तांपर्यंत जाउुन पोहोचल्या आहेत..... दलित साहित्याने वाड.मयीन संस्कृतीचा प्रवाह सर्व पिडीत व शोषितांपर्यंत गेला पाहिजे अशा प्रकारची जाणीव निर्माण केली, हे नाकारता येत नाही, '' (6) हे योगदान गृहीत धरून आदिवासी कवितेतील विद्रोहाचे स्वरूप मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

Title :*आदिवासी मराठी कवितेतील विद्रोह*
Source:Golden Research Thoughts [2231-5063] *विकास वीर* **yr:2013 vol:2 iss:12**

3)***आदिवासी कविता :–***

आदिवासी कवितेपासून आदिवासी साहित्याचाच नव्हे तर एकूण साहित्याचाच प्रारंभ झाला असे मानले जाते. आदिवासी कवितेसंदर्भात डॉ. विनायक तुमराम म्हणतात, '' आदिवासी कविता हे आदिवासी साहित्यसृष्टीचे नक्षीदार कोरीव व भक्कम महाद्वार होय. आदिवासी साहित्याची अस्तित्व नोंदच मुळी कवितेने झाली आहे. ही कविता म्हणजे अस्तित्व आणि अस्मिता यांच्या रक्षणार्थ सुविद्य, सुजान व सजग आदिवासी मानसिकतेने उभारलेले शब्दांचे शस्त्रागार..... ''(7)

1960 च्या दरम्यान मराठी साहित्यामध्ये ग्रामीण, दलित स्त्रीवादी साहित्याचे प्रवाह सुरू झाल्याचे दिसते. परंतु आदिवासी साहित्याचा प्रवाह सुरु होण्यासाठी 1960 नंतर जवळपास 20 वर्षाचा कालखंड जावा लागला. या पाठीमागे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. अनेक घटक जबाबदार आहेत. आदिवासी काव्याची खरी रूजुवात डॉ. विनायक तुमराम यांनी 10 व 11 नोव्हेंबर 1979 रोजी भद्रावती, जि. चंद्रपूर येथे ' पहिले आदिवासी साहित्य संमेलन ' आयोजित करून केली. (8) असे मानले जाते. त्यामुळे सदर शोधनिबंधामध्ये 1980 नंतरच्या उपलब्ध आदिवासी कवितेमधील विद्रोहाचे स्वरूप मांडणे योग्य ठरते.

4)***आदिवासी कवितेतील विद्रोहाचे स्वरूप :–***

'' विद्रोह हा मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी असतो. एक मुल्यसमूह नाकारून नवा मूल्यसमूह अस्तित्वात यावा म्हणून विद्रोहाचा अवतार असतो.''(9) म्हणजेच विद्रोहाचा विचार मूल्यांच्या संदर्भात केला जातो. विद्रोह ही मुळात मूल्यसंघर्शाच्या इतिहासाची निर्मिती आहे. विद्रोहाच्या या रूपाचा उल्लेख नसताना नरहर कुरूंदकर लिहितात, '' विद्रोह ही जाणीव सार्वत्रिक आहे. ती जशी दलितांच्यापुरती मर्यादित नाही तशी ती विसाव्या शतकापुरतीही मर्यादित नाही आणि भारतापुरतीही मर्यादित नाही. ही सार्वत्रिक जाणीव कैक शतकांपूर्वी होउुन गेलेल्या भारतीय चार्वाकात आणि भारताबाहेर झालेल्या मार्क्ससारख्या विचारवंतातही आढळते. ''(10) आदिवासी कवितेतील विद्रोलाही ही भूमिका लागू पडते. त्यामुळे या कवितेला भारतीय मूल्यसंघर्शाची पार्श्वभूमी प्राप्त होताना दिसते. विद्रोह हा जसा मूल्यसंघर्षाच्या अपरिहार्यतेतून व्यक्त होतो तसाच त्या त्या काळाची एक अभिव्यक्ती पध्दत म्हणूनही व्यक्त होतो. याप्रकारे विचार केला तर त्या घटनातच विद्रोही अभिव्यक्तीची बींज दडलेली असतात. पारंपरिक व्यवस्था नाकारताना इतिहासाच्या पाश्वभूमीचा आधार हा सुध्दा विद्रोह समजून घ्यायला उपयोगी पडतो. एवढेच नव्हे तर विद्रोहामुळेच आदिवासी कवितेची जोरकसता अधोरेखित करायला मदत होते.

आदिवासी हा या मातीचा खरा मालक, धनी होय. येथील जल, जंगल व जमीन यावर आदिवासीचाच पहिला अधिकार असताना आज तो विस्थापित झाला आहे. भूमीहीन झाला आहे, वनवासी झाला आहे. जल, जंगल व जमीन यापैकी काहीच त्याच्याकडे आज नाही. हे शोषण देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही चालू आहे. प्राचीन काळी आदिवासी समाजावर आक्रमण करून त्यांना देशोधडीला लावण्यांत आले. डोंगरांचा, जंगलाचा आश्रय घेवून कसातरी बचाव करण्याचे काम त्यांनी त्या काळामध्ये केले. आज स्वातंत्र्यानंतर इथल्या शासनाकडून वनकायदे, धरण इ. शासकीय योजनांमुळे आदिवासी पुन्हा देशोधडीला लागू लागला आहे. स्वातंत्र्य भारताला मिळाले पण आदिवासींच्या स्वातंत्र्यावर गदा आली. त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा येत असतानाच त्यांची पर्यायी व्यवस्था करण्यामध्ये शासन अपयशी ठरले आहे. त्यामुळे शासनाविषयीची एक नकारात्मक भावना या आदिवासींच्या मनामध्ये निर्माण झाली. त्यामधूनच विद्रोह जन्माला आला. त्याने शब्दरूप धारण केले व तो कवितांमधून प्रकट होउु लागला.

शासकीय प्रकल्प, धरणे, खाणी यांची निर्मिती आज फार मोठया प्रमाणावर आदिवासी भागामध्ये सुरू आहे. आदिवासींच्या विकासासाठी हे सारे सुरू आहे अशा वल्गना केल्या जातात. मात्र प्रत्यक्षात आदिवासींना भकास करण्याची ही कारस्थाने आहेत. याची चालूल आदिवासी कवींना लागलेली आहे.' जेथे आदिवासी, तेथेच धरण, मग तेच आदिवासींचे मरण.' ' आदिवासी प्रकल्प म्हणजे आदिवासीला मारण्याचा संकल्प ' अशी भीतिदायक समीकरणे बनू लागली आहेत. या प्रकल्पांना विरोध केला तर विकासाचे विरोधक म्हणून बोंब मारली जाते म्हणून कवी चामुलाल राठवा आपली कैफियत मांडताना उपहास व उपरोधाचा सूर लावतो.

'' प्रकल्प.....?
इतरांचा कायाकल्प
आमचा तर मरण संकल्प
कोण म्हणतो आम्ही देशविरोधी ?
कोण म्हणतो आम्ही विकासविरोधी ?
अहो, असे नाहीच मूळी
पण.....
बळी तो कानपिळी
सोम्याच्या सुखासाठी
गोम्याचा बळी ?
वाहरे बंधुता आणि समता !
वाहरे देशाची एकता!!''

आपल्याच भूमीत आपण उपरे झालो आहोत याची खंत कवी राठवा यांना सतावते आहे. देशाचा मूळधनी असूनसुध्दा त्याला 'ब्र' शब्द काढण्याची, अन्यायाविररूध्द बोलण्याची, ताठमानेने चालण्याची सोय राहिलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यानंतर विकासाच्या पहिल्याच टप्प्यावर आदिवासी हा कुचाळकीचा विषय बनला आहे. इथल्या मूठभर संधीसाधूंच्या शड्यंत्राला तो बळी पडू लागला आहे. म्हणून कवी म्हणतो –

'' विस्थापनापूर्वी केल्या मोठया मोठया बाता
आता फक्त लाथाच लाथा
मधाचे बोट दाखवून
तोंडात घलता कोरडे बोट
हाच देशहिताचा निकश की–
आमच्या विनाशातून तुमचा विकास
आमचे होईल जीवन भकास
तुमचे मात्र चालले झकास

हाच का देशाचा विकास ?''

या कवितेतून कवी ' विकास ' या संकल्पनेविषयीची मूलभूत प्रश्न उपस्थित करतो आहे. चार लोकांच्या जीवनात समृध्दी आणताना जर दोन लोकांचे आयुश्य देशोधडीला लागणार असेल तर त्याला ' विकास 'म्हणता येईल का ?हा कवीचा खरा प्रश्न आहे. या कवितेमधून कवी टोकाचा विद्रोह मांडत नसला तर समजूतीच्या स्वरामध्ये उपहास, उपरोधाचा आधार घेउुन आपली खंत व्यक्त करतो आहे.

नर्मदा नदीवर ' सरदार सरोवर ' बांधले जात असताना अनेक आंदोलने झाली. ' नर्मदा बचाव ', ' जंगल बचाव ', ' आदिवासी बचाव 'इ. परंतु त्या आंदोलनाचा प्रत्यक्षात काहीच फायदा आदिवासी बांधवाना झाला नाही. नर्मदा नदीच्या दोन्ही काठांवर वर्षानुवर्षे राहणारे हजारो आदिवासी या धरणामुळे विस्थापित झाले. त्यांच्या पुर्नवसनाचा प्रश्न अद्यापि सुटलेला नाही. प्रकल्पासाठी शासनाकडे निधी असतो परंतु पुर्नवसनासाठी मात्र त्यांच्याकउे निधी नसतो ही भूमिका आदिवासींवरती अन्याय करणारी आहे. अशिक्षित, भोळया–भाबडया आदिवासींला हे गौडबंगाल समजत नाही, म्हणून या प्रवृत्तीवर प्रहार करताना कवी भुजंग मेश्राम म्हणतात,

'' तुझ्या दोन्ही काठावरच्या ठेकेदारांनी
केलेय सुरू विचारांचे मंथन
ज्यातून ढवळत नाही तळाचा गाळ
त्यांची कुठलीही लाट वाहून आणेल
आमच्या काळया भूमीवर गाळ
यावर माझा नाही विश्वास. ''

आदिवासींच्या नावावर वेगवेगळी आंदोलने करणा–या व्यक्ती व प्रवृत्तींबाबत कवी आपला अविश्वास दर्शवितो आहे. कवी सुखदेवबाबू उईके धरणामुळे विस्थापित झालेल्या आदिवासींचे दुःख मांडताना लिहितात,

'' वनामधी वनपुत्र, बंदिस्त कायद्यानं ।
विकासाची गंगा आली, घेउूनि मोठी धरणं
आम्ही गमवितो सारं, उध्वस्त होती रे संसार
नशीबी आमच्याच का रे । मरण विस्थापना ।। ''

धरणांमुळे विकास दुस–यांचा होतो परंतु मरण मात्र आदिवासींचेच होते असे का? हा प्रश्न हे कवी उपस्थित करतात. आदिवासींचे प्रश्न घेवून अनेक व्यक्ती, संघटना लढा लढवितात. त्यातून प्रसिध्दी, पैसा मिळवतात व आदिवासींचे कैवारी म्हणून मिरवतात. प्रत्यक्षात त्यांना आदिवासींबद्दल कणव असतेच असे नाही. भेळया भाबडया अशिक्षित आदिवासींची लुबाडणूक छुप्या पध्दतीने करण्यामध्ये त्यांचे कैवारीच पुढे असतात. त्यामुळे एकूणच आदिवासींचा येथील व्यक्ती, समाज, शासन, राष्ट्र यांच्यावरचा विश्वास उडून जातो. स्वातंत्र्याने आम्हाला काय दिले ?हा प्रश्न कवी माधव सरकुंडे यांना पडतो मग ते लिहितात,

'' वारे स्वातंत्र्य !
उपाशी राहण्याचं स्वातंत्र्य !
भीक मागण्याचं स्वातंत्र्य !
चो–या करण्याचं स्वातंत्रय !
बलात्कार करण्याचं स्वातंत्र्य!
कुणाला लुटण्याचं स्वातंत्र्य !
पक्षातून फुटण्याचं स्वातंत्र्य !
भोळया भाबडया माणसाच्या जगण्याचं टपालच
गहाळ केले आहे या स्वातंत्र्याने ''

इथे कवी स्वातंत्र्याबद्दलच प्रश्नचिन्ह उपस्थित करतो आहे. देशामध्ये अराजकता, भ्रश्टाचार, खून, बलात्कार इ. घटनांचा पूर आला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधूता या मूल्यांची पायमल्ली होते आहे. अन्याय, अत्याचारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होते आहे. त्यामुळेच आदिवासी बांधव हवालदिल झाला आहे. हे सारे देशात घडत असले तरी कवीचा या देशावरचा विश्वास उडालेला नाही म्हणून तो अत्याचाराचा पाढा वाचता–वाचता शेवटी भारत माझा देश आहे ' असे अभिमानाने म्हणतो,

'' पोटाला पोटभर भाकर नाही
अंगाला धड लक्तर नाही
अन् तुम्ही साले देशाचे गुण गाता ?
पण तरी दोस्त हो ! भारत माझा देश आहे..... ''

आदिवासींच्या मनामधील शासनाच्या प्रकल्पांविषयीचा विद्रोह प्रामुख्याने कवी चामुलाल राठवा, भुजंग मेश्राम, सुखदेवबाबू उईके, माधव सरकुंडे इ. कवी व्यक्त करतात.

आदिवासींची संस्कृती नागर संस्कृतीपासून दूर आहे. त्यांचा धर्म, प्रार्थना उपासना, धार्मिक विद्या, जादूविद्या, देवता, विवाहपध्दत, कुटूंबपध्दत, अर्थव्यवस्था, कायदा न्याय व शिक्षा या सर्वच पातळयावरती त्यांचे हे वेगळेपण उठून दिसते.

यातील काही भाग टाकाउु असेल, त्याज्य असेल परंतु काही भाग मात्र अभिमानास्पद निश्चितच आहे. त्यामुळे आदिवासी कवी सांस्कृतिक पातळीवरती विद्रोह पुकारतात आणि दोन्हीही संस्कृतीची उघडउघड तुलना करून काय तो सोक्षमोक्ष समोरासमोर लावतात.

भामरागडातल्या आदिवासी बायका अर्धनग्न राहून पडेल ते कामे करतात. पंप्रचाखातर पायांना चिंध्या, पळसपाने बांधून व पोराला पोटाशी धरून उन्हातान्हात मोह, डिंक, बोरे, टेंभरे वेचत दिवसरात्र हिंडतात. अशा स्त्रियांची आब्रु लुटायला नागर संस्कृतीतील संधीसाधू लोक टपूनच बसलेले असतात. म्हणून कवी माधव सरकुंडे संतापाने लिहितात.

1)'' भामरागडातल्या अर्धनग्न माडिया बाया बघितल्या
की स्वातंत्र्य म्हणजे अशील चेष्टाच वाटते मला
अश्लिलतेची गोष्ट निघाली म्हणून सांगतो,
तुमचा एक साहेब आमच्या राहोटयात हमेशा येतो
रात्री एखादी माडीया तरूणी रेस्टहाउसवर घेउन जातो ''

2)अजूनही माझी माय घरात नागरी राहून
लेकीला घराबाहेर पाठवते किंवा.....
लेकीला नागरी ठेवून माय घराबाहेर निघते
आणि त्यांच्या दिवसातून दहा साडया फेडणा–या मायलेकी
एकाच वेळी सिनेमात जावून बसतात
तरी भडवे म्हणतात यांना आरक्षणाची गरज काय ?
(कवी कृश्णकृमार चांदेकर)

3)आम्ही मात्र
चंदण्याला साक्षीला ठेवून
जीवनसाथी निवडण्यास गोटूलमध्ये येतो
त्यावेळी तुम्ही म्हणता
गोटूल म्हणजे काय हो ?
व्यभिचाराचे, स्वैराचाराचे केंद्र का ?''
;कवियीत्री कुसुम अलामद्ध
या कवितांमधून सार्वकालिक विद्रोह व्यक्त होतो.

' घोटूल ' हे आदिवासींचे सांस्कृतिक केंद्र आहे. गोंड, माडिया जमातीत घोटुलला अनन्यसाधारण महत्व आहे. आदिवासी समाजातील तरूण मुले आणि मुली संध्याकाळचा वेळ एकत्र घालवतात ते ठिकाण, ती संस्था म्हणजे घोटूल किंवा युवागृह होय. या घोटुलमध्ये मुले–मुली यांचा एकमेकांशी परिचय होतो. परिचयातून परस्पर संमतीने ते विवाहबध्द होतात. घोटुलमध्ये तरूण आपण स्वतः तयार केलेली फणी त्याला पसंत पडलेल्या प्रेयसीला देतो. ती तरूणी ती फणी केसांच्या अंबाडयात लावून मिरवत असते. यामधून ती फणी व तो मुलगा आवडल्याचे ती सूचित करत असते. घोटुलातील सतत संपर्क, एकत्र राहणे यातून त्यांच्यात प्रेम निर्माण होते. त्यानंतर त्यांचा विवाह लावून देण्यांत येतो. घोटुलमध्ये मुलीला मुलाच्या बरोबरीने आपला जोडीदार निवडण्याचा अधिकार असतो. यामधून आदिवासी स्त्रीचे स्वातंत्र्यच सूचित होते. नागर संस्कृतीपेक्षा वेगळी व आदर्शवत अशी 'घोटुल' ची पध्दत आदिवासी संस्कृतीमध्ये असते. परंतु त्याकडे दुर्लक्ष करून 'घोटुल ' हे व्यभिचाराचे व स्वैराचाराचे केंद्र आहे असे नागर संस्कृती मानते म्हणून इथे कवी नागर संस्कृतीची संभावना करून तुमच्या संस्कृतीमध्ये काय चालते हे दाखवून देण्याचा प्रयत्न करतात. म्हणून ते ' तुमचा एक साहेब ' 'त्यांच्या' 'तुम्ही म्हणता ' इ. शब्दप्रयोग करतात. हे शब्दप्रयोग नागर संस्कृतीला उद्देशून केलेले आहेत.

'' जोशी बाईंची मांडी दिसली तर
ती अब्रु ठरते
आणि मडावी बाईची मांडी दिसली तर.....
ती संस्कृती ठरते, असे का ?''

स्त्री मग ती नागर असो वा आदिवासी दोघींनाही एकच नियम असायला पाहिजेत. परंतु प्रत्यक्षात तसे घडत नाही. आदिवासी स्त्रीने उघडंनागडं राहणे हीच तिची संस्कृती आहे असे तिला सांगितले जाते व आजपर्यंत ती त्यामध्येच धन्यता मानत आली आहे. तिच्या या देहप्रदर्शनामुळे ती इतरांच्या वासनांची शिकार बनते आहे. आदिवासी स्त्री ही स्वच्छंद वृत्तीची आहे. ती मुक्तपणे निसर्गाच्या सानिध्यात राहते. नदीच्या ओढयाच्या पाण्यात ती निर्भयपणे डुंबत राहते. त्यावेळी जंगलात भटकायला आलेले आंबटशौकिन तिच्या मांडया, पोट–या व छातीवर नसलेला पदर बघायला टपलेले असतात. त्या बिचारीच्या ध्यानीमनी काहीही नसते. ती तिच्याच तंद्रीत असते. मात्र यातून पुढे काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तिने सावध पवित्राा घेतला पाहिजे, अंगभर कपडे घतले पाहिजे अशी जागृतील कवी कवितेच्या माध्यमातून करतात. अंगभर गोंदून घेवून त्यातच आनंद मानणा–या स्त्रीला सावधानतेचा इशारा देताना कवियित्री उशाकिरण अन्नाम लिहितात,

'' माय म्हणाली
पोरी ! सोड ग जुनं
गोंदू नंग अंग, नाचू नगं संग
दावू नगं अंग, राहू नगं नंग
'महा जमाना गेला अमावस्येत '
जिंदगीभर नाग नाचला
म्हणून म्हणते पोरी ! झांक झांक तू अंग
घे कापड–सावर उर, ले–अंगभर कापडं ''

स्त्रीच्या अस्मितेचे भान आलेली स्त्री कवियित्रीने या कवितेमध्ये चितारली आहे. ती आत्मसन्मानासाठी आता जागी होणार आहे. प्रस्थापितांची दृष्टी विकृत असल्यामुळे आदिवासी स्त्रीने नटण्यापेक्षा अंगार बरसवणारी.... पळसाची लाल तांबडी आग व्हावे असेही कवयित्री सुचवते आहे.

आर्य व अनार्य या दोन वंशामधील वाद खूप जुना आहे. या दोघांमध्ये प्राचीन काळी जो संघर्ष झाला त्यामधून रक्तरंजित क्रांती घडली. अनार्यांचा त्यामध्ये पराभव झाला. त्यांची अमानुश कत्तल करण्यांत आली. त्यांचा इतिहास, संस्कृती, कला दडपून टाकण्यांत आल्या. मूळ लोकांना आर्यांनी देशोधडीला लावले. त्यांना जंगलात, द–याखो–यात पिटाळले. ते स्वतःहून जंगलात गेले नाहीत. तर त्यांना हाकलून

देण्यांत आले. आर्य–अनार्य यांच्यातील हा संघर्ष भीषण होता. यामध्ये अनेक अनार्यांचा बळी गेला. हा संघर्ष आर्यांनी निर्दयपणे, निर्घृणपणे लढविला. आदिवासींच्या कत्तली करण्यांत आल्या. घरे–दारे जाळण्यात आली. या संग्रामाच्या अनेक खुणा ऋग्वेदात पानोपानी विखुरलेल्या आहेत. अनार्यांचे साहित्य, कला, संस्कृती आर्यांना त्या समाजापर्यंत पोहोचू द्यायची नव्हती म्हणून ती नष्ट करण्यांत आली. या युध्दाचे वर्णन महात्मा फुले यांनी पुढील प्रमाणे केले आहे.

'' गोंड भिल्ल क्षेत्री होते मूळधनी ।
ठराणी मागुनी आले येथे ।।.....
शूर भिल्ल कोळी शराने तोडीले ।
हाकलून दिले रानीवनी ।। ;11द्ध

आर्यांनी हाकलून दिल्यापासून हा आदिवासी समाज आजपर्यंत जंगलातच वास्तव्य करत आला आहे. आपल्या पूर्वजांची आठवण झाल्यावर कवीची लेखणी भूतकाळात शिरते. कवी विनायक तुमराम लिहितात,

'' अवसेच्या वादळी रात्री
उणावलेल्या आभाळातील ढगं चेतवून मी
सूर्य प्रांताकडे जाणारे रस्ते हुडकले
तेंव्हा अचानक मला
माझ्या गणगोतांचे थडग्यांचे गाव गवसले.''

आपल्या पूर्वजांच्या कटू स्मृती कवी जसा विसरू शकला नाही. तसाच तो प्राचीन युगातील वर्णव्यवस्थेला बळी पडलेल्या एकलव्य व कर्ण यांनीही विसरू शकलेला नाही. वर्णव्यवस्था ही मानवी मूल्यांना, समतेला महत्व देत नसल्यामुळे या व्यवस्थेने अनेकांवर अन्याय केले. आदिवासींच्या पोटी जम्नलेल्या एकलव्याचा गुरूदक्षिणा म्हणून अंगठा मागणारा गुरू हा आर्यांचे प्रतिनिधित्व करणारा आहे. अशा असंख्य एकलव्याची बोटे या व्यवस्थेने छाटली आहेत म्हणून चिडलेला कवी आपला संताप व्यक्त करताना लिहितो,

'' गुरूदक्षिणेचे निश्ठाशास्त्र जाळावेसे वाटले असेल
वनपुत्रा ! तेव्हा वेदनांचा वनवा झाला असशील तू
अरे वर्णवादी आयुश्याने नाकारलेले गुरूत्व
शब्दबध्द झाले होते
प्रस्थापित आयुश्याच्या वीरतेशी
मान्य नाही इथल्या दीर्घजीवी वर्णशाहीला
तू श्रेष्ठतम धनुर्धर म्हणून
मित्रवरा ! तुझ्या भात्यातील तळपणा–या तीक्ष्ण तीरांना
करणार आहे मी
क्रांतीच्या मशाली अन्
तुझ्या अंगठयातून सांडलेल्या रक्ताने
लिहिणार आहे मी इथल्या सुवर्णशाहीचा मृत्यूलेख ''

असा विद्रोह कवी विनायक तुमराम व्यक्त करतात. प्राचीन काळापासून चालत आलेल्या शोषणाविररूध्द खूप सोसले आहे. आता त्याला नकार दिला पाहिजे म्हणून कवी म्हणतो, '' सोसलेल्यांना सोसल्याचा सराव असतो अशांना सोसणे काही नवीन नसते. हया सोसण्याला जेंव्हा निग्रहपूर्वक नकार मिळतो तेंव्हा परिवर्तनाचे युग सुरू होत असते. परंतु हा नकार कुठे ना कुठे, कुणी ना कुणी नोंदविला पाहिजे. तरच अन्यायाच्या विरोधात संताप उसळेल, नकारात्मक भूमिकेचा जन्म होईल.'' (12) यासाठीच कवी इथल्या वर्ण–वर्ग, वंश व्यवस्थेच्या विरोधात आपला नकार ठामपणे नोंदवतो आहे.

सध्या लोकशाहीमध्ये ठोकशाहीला किंमत आहे. त्यामुळे लाचारी पत्करण्याचे दिवस आता संपले आहेत. लाचारी पत्करून, ओरडून लोकशाहीमध्ये कितीही तक्रारी केल्या तरी तिला पाझर फुटत नाही. म्हणून शेवटी चिडलेला कवी महाविध्वंसाची प्रतिज्ञा करतो. तो लिहितो –

'' पण ज्याले बोट दाखवलं त्यानं बोट कापलं
ज्याले हात दाखवले त्यानं हात छाटले
आता आम्ही लाचारी पत्करून
काही सांगणार नाही ....
शोषणकर्त्यांचे मुर्दे पाडल्याशिवाय
थांबणार नाही..... !''

या कवितेमधून टोकाचा विद्रोह कवी बाबाराव मडावी व्यक्त करतात. आदिवासी कवितेमधून व्यक्त होणा–या या अभिव्यक्तीबद्दल डॉ. तुमराम म्हणतात, '' वनजीवनाचे जसे दर्शन तशीच अभिव्यक्ती. हया अभिव्यक्तीला कुणी आक्रंदन म्हणतील, कुणी अंतर्मनाचा तळतळाट म्हणतील, कुणी भावनांचा उद्रेक म्हणतील तर कुणी डिवचललेल्या व हिणवलेल्या जाणिवेने आरंभिलेला प्रतिशोध म्हणतील, '' (13) म्हणणारे काहीही म्हणतील परंतु आदिवासी कवितेमधून व्यक्त होणारा विद्रोह मात्र स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांसाठी पुकारलेला विद्रोह आहे. त्यामुळे तो रास्तच आहे असे मला वाटते.

5)निष्कर्ष :–

1.आदिवासी कवितेमधून प्राचीन काळापासून वाळीत टाकल्याचे इतिहास, संस्कृती, कला, अस्मिता दडपून टाकल्याबद्दलचे दुःख व्यक्त होते. आदिवासींच्या दुःखाची सल, वेदनेची कळ खोलवर आहे. त्यांच्या वेदनेचा परिसर व्यापक आहे. आदिवासींचे हे दुःख आदिम आहे. प्रस्थापित

व्यवस्थेने त्यांचे माणूसपणच नाकारले होते. त्यामुळे माणूसपणाच्या स्वीकारासाठी आदिवासी कवींनी बंडाचा झेंडा फडकविला आहे. विद्रोह पुकारला आहे.
2.आदिवासी कवितेमधून वर्ण, वर्ग, वंश याबरोबरच राष्ट्र, शासन संस्कृती यांच्या विरोधात विद्रोह प्रकट होतो.
3.वेदना, विद्रोह नकार या तत्वांचा पुरस्कार करणारी आदिवासी कविता प्रस्थापितांकडे याचना करत नाही तर आपला न्याय हक्क मागते आहे. त्यामुळे या कवितेमधून प्रकट होणारा विद्रोह टोकाचा आहे व तो रास्त आहे.
4.स्वातंत्र्य, समता व बंधुता या घटनेतील तत्वांची पायमल्ली जेंव्हा शासनांकडून होते तेंव्हा आदिवासी कविता शासनाविषयीचा असंतोष व्यक्त करतानाच देशाच्या स्वातंत्र्याबद्दल मूलभूत प्रश्न उपस्थित करते.
5.शासनाच्या दुटप्पी धोरणाचा निशेध करतांना आदिवासी कविता शासनाच्या वर्मावर बोट ठेवते. आदिवासींच्या दुरावस्थेचे नेमके कारण मांडते व शासनाच्या आदिवासी विकास विभागाचीच खिल्ली उडवते. ' आदिवासी जनहिताय 'हे ब्रीद घेउुन कार्यरत असणा–या विभागाचे खरे रूप वेगळेच आहे याची जाणीव करून देतानाच आदिवासी कविता नवीन ब्रीद मांडते.
6. आदिवासी प्रकल्प म्हणजे आदिवासींना मारण्याचा संकल्प ', 'जेथे आदिवासी तेथेच धरण, मग तेच आदिवासींचे मरण' अशी आदिवासी विकास विभागाच्या ब्रीदवाक्याची विद्रोही स्वरूपात पुर्नमांडणी आदिवासी कवितेमधून केली जाते.
7.आदिवासी संस्कृती व नागर संस्कृती यांच्यामध्ये बरेच सांस्कृतिक अंतर आहे. या भेदरेशा अधिक ठळक करण्याचे काम आदिवासी मराठी कविता करते.
8.समकाळात शासनांच्या धोरणाविरूध्द आदिवासी कवितेमधून विद्रोह प्रकट होतो तसाच प्राचीन काळी होउुन गेलेल्या एकलव्याच्या अंगठा छाटण्याच्या अमानवी प्रवृत्तीविरोधातही कवी विद्रोह पुकारतात.
9.आदिवासी कवितेमधून त्यांच्या समाजातील क्रांतिकारक, युगपुरूष, समाजसुधारक यांचा गौरवाने उल्लेख केला जातो. एकलव्य, बिरसा, मुंडा, उमाजी नाईक यांच्यापासून क्रांतीची प्रेरणा घेउुन विद्रोहाचे, बंडाचे शंख फुंकण्याचे काम आदिवासी कवी करत आहेत.
10.आदिवासी कवितेमध्ये पुरूषांच्या बरोबरीनेच स्त्रियाही आता काव्यलेखन करू लागल्या आहेत. समाजातील स्त्रियांना जागृत करण्याचे काम, आत्मसन्मान, आत्मप्रतिश्ठा प्राप्त करून देण्याचे काम या कवितेमधून केले जाते.

6) ***समारोप :–***

एकूणच वेदना, विद्रोह व नकाराचे तत्व सोबत घेउुन वाटचाल करणारी आदिवासी कविता स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची पुर्नस्थापना करण्यासाठी विद्रोह पुकारते आहे. वर्ण, वर्ग, वंश यांच्याविरोधात संघर्श करतानाच शासन, राष्ट्र, संस्कृती यांच्यावरतीही उपहास व उपरोधाचे कोरडे ओढते आहे. शासनद्रोह, राष्ट्रद्रोह, संस्कृतीद्रोह त्यांच्या कवितेमधून प्रकट होत असला तरी परिवर्तनाचे युग येईल व हे सारे बदलून जाईल असा आशावादही ही कविता व्यक्त करते. कवितेमधून विद्रोह प्रकटताना भाषा आक्रस्ताळेपणाचे रूप धारण करत नाही तर समंजसपणे उपरोध, उपहासाच्या माध्यमातून ती प्रकटते हे या कवितेचे महत्वाचे बलस्थान आहे.

संदर्भ सूची

1.भाटवडेकर, मो.वि. : 'अर्थच्छटा कोश 'स्नेहवर्धन प्रकाशन प्रथमावृत्ती 2007,पृ .क्र. 92
2.जेशी, महादेवशास्त्री : 'भारतीय संस्कृतिकोश' खंड 1 भारतीय संस्कृतिकोश मंडळ, प्रथमावृत्ती 1962 पृ. क्र. 428
3.कुलकर्णी शौनक : 'महाराष्ट्रातील आदिवासी' डायमंड प्रकाशन, प्रथमावृत्ती 2009 पृ. क्र. 1
4.रोंगटे, तुमराम : 'आदिवासी कवितेचा उशःकाल आणि सद्यस्थिती'संस्कृती प्रकाशन, प्रथमावृत्ती 2007 पृ.क्र. 8
5.तत्रैव : पृ. क्र. 7,8
6.वाघमारे, जनार्दन : 'साहित्य चिंतन' प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती 1992 पृ. क्र. 84
7.तुमराम, विनायक : ' प्रस्तावना तिरकमठा' हरिवंश प्रकाशन प्रथमावत्ती 1999 पृ. क्र. 6
8.रोंगळे, तुकाराम : उ.नि. पृ. क्र.14
9.फडके, भालचंद्र : 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह ' श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती 1977 पृ.क्र. 69,70
10.कुरूंदकर, नरहर : 'उत्थानगुंफा'(प्रास्ताविक) प्रबोधन प्रकाशन प्रथमावृत्ती 1977 पृ. कृ. 10,11
11.पंडित, ग. शां. : 'आदिवासी जीवन व मराठी साहित्य' हाकारा, जाने–मार्च 2000 पृ. क्र. 21
12.तुमराम, विनायक : 'मनोगत ' 'गोंडवन पेटले आहे ' प्रथमावृत्ती 1987 पृ. क्र. 6
13.ठाकरे, राजेंद्र : 'आदिवासी कविता : एक आकलन ' सुगावा डिसेंबर 1999 पृ. क्र. 76